सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
## कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
सर ज.जी.कला महाविद्यालय आवार, डॉ.दा.नौ.मार्ग, मुंबई - ४०० ००१. दुरध्वनी क्र.२२६२०२३१/३२
Website :- www.doa.maharashtra.gov.in Email:- dirdoa.mum-mah@gov.in/directorateofart@gmail.com

क्रमांक - डिओओ/२०२४/चार/२२४ दिनांक :- १९ जानेवारी, २०२४

## परिपत्रक

[शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड) परीक्षा - २०२३ ]
निकाल जाहीर करणेबाबत.

कला संचालनालयाच्या दिनांक १२.०७.२०२३ रोजीच्या परिपत्रकानुसार दिनांक ०४ ऑक्टोबर, २०२३ ते ०७ ऑक्टोबर, २०२३ या कालावधीमध्ये शासकीय रेखाकला परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. सदर परीक्षेचा निकाल व गुणवत्ता यादी www.doa.maharashtra.gov.in / https://dge.doamh.in या संकेतस्थळावर खालील प्रमाणे प्रसिध्द करण्यात येणार आहे. तसेच प्रमाणपत्र व दुय्यम निकालपत्रक डाऊनलोड करणे /निकाल पडताळणी / ऑनलाईन नाव नोंदणी करताना विद्यार्थ्यांच्या नावामध्ये त्रुटी असल्यास नावातील त्रुटींची दुरुस्ती करिता ऑनलाईन अर्ज सादर करण्याचा तपशील खालील प्रमाणे.

| क्र | तपशील | इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा | एलिमेंटरी ड्रॉईंग ग्रेड परीक्षा |
|---|---|---|---|
| १ | निकाल दिनांक | दि.३१.०१.२०२४ दुपारी १२.०० | दि.०५.०२.२०२४ दुपारी १२.०० |
| २ | प्रमाणपत्र | सहभागी शाळेंना लॉगइनवरुन ३ वेळा डाऊनलोड करता येईल. | |
| | | केंद्रांना ३ वेळा डाऊनलोड करता येईल. | |
| ३ | दुय्यम निकालत्रक | केंद्रांना ३ वेळा डाऊनलोड करता येईल. | |
| ४ | निकाल पडताळणी | ऑनलाईन पध्दतीने केंद्र प्रमुखांच्या लॉगइनवरुन अर्ज करता येईल. दिनांक २२.०२.२०२४ पर्यंत (प्रत्येकी रु.६०/- प्रमाणे पडताळणी शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरणे.) | |
| ५ | प्रमाणपत्र दुरुस्ती | ऑनलाईन नाव नोंदणी करताना विद्यार्थ्यांच्या नावामध्ये त्रुटी असल्यास त्रुटींच्या दुरुस्तीकरिता ऑनलाईन पध्दतीने केंद्र प्रमुखांच्या लॉगइनवरुन दिनांक २२.०२.२०२४ पर्यंत अर्ज करता येईल. (प्रमाणपत्र दुरुस्ती करिता प्रति विद्यार्थी (महाराष्ट्र) रु.१००/- व (महाराष्ट्राबाहेरील) रु.२००/- प्रमाणे दुरुस्ती शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरणे.) | |

आपल्या केंद्रावरील सहभागी शाळांचे तसेच खाजगी परीक्षार्थ्यांचे निकाल दिनांक ३१.०१.२०२४ व दिनांक ०५.०२.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता ऑनलाईन पध्दतीने प्रसिध्द करण्यात येणार असल्याचे तसेच प्रमाणपत्र ऑनलाईन पध्दतीने मिळणार असल्याबाबतची माहिती सहभागी शाळांना / सर्व संबंधितांना कळविण्यात यावे.

विहीत कालावधीमध्ये प्रमाणपत्र व दुय्यम निकालपत्रक डाऊनलोड करुन निकालपत्रानुसार प्रमाणपत्र बरोबर असल्याची खातरजमा केंद्र प्रमुखांनी करुनच संबंधितास वितरीत करण्यात यावे.

डाऊनलोड केलेली प्रमाणपत्रे जतन करुन ठेवावीत. व संबंधितांना मागणीनुसार उपलब्ध करुन देण्यात यावीत. डाऊन लोड केलेली प्रमाणपत्रे व दुय्यम निकालपत्रके जतन करुन ठेवण्याची जबाबदारी केंद्रप्रमुखाची राहील. केंद्र प्रमुखांनी प्रमाणपत्राची सॉफ्ट कॉपी जतन करुन ठेवावी व सहभागी शाळा तसेच विद्यार्थ्यांना आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन देण्याची सर्वस्वी जबाबदारी केंद्र प्रमुखांची राहील.

(ना.म.वाघमोडे)
परीक्षा नियंत्रक,
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
मुंबई.

प्रति,
केंद्र प्रमुख, शासकीय रेखाकला परीक्षा (सर्व)
त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक सहभागी शाळेंच्या सर्व मुख्याध्यापक /प्राचार्य संबंधित विद्यार्थी व पालक यांच्या निदर्शनास आणावे.

प्रत :- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१) आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) शिक्षण संचालक, (माध्यमिक )महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व).
४) अध्यक्ष/सचिव, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.
५) निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६) सहायक निरीक्षक, चित्रकला व शिल्प विभागीय कार्यालय, नागपूर/औरंगाबाद.
७) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हापरिषद (सर्व)
८) शिक्षणनिरीक्षक, बृहन्मुंबई दक्षिण/उत्तर/पश्चिम.
९) निवड नस्ती.